(1)

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com

Website:www.rdtenagpur.org.in

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

क्र.तंशिसं/विकाना/शैवि/ Poly meritlist /२०१५/3262

दिनांक: 23 OCT 2015

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व तंत्रनिकेतन संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

**विषय : संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील तंत्रनिकेतन अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम वर्ष तसेच थेट व्दितीय पदवीका अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यांत येणार आहेत. पडताळणी करतांना सर्वसाधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यांत यावी.

१. संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची आपले संस्थेतील प्राचार्यांनी/ संस्था प्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी करणे आवश्यक आहे. अशा सुचना संचालनालयाने आपणांस दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने आपले संस्थेत सर्व प्रकारच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी केलेली असल्याचे संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीचे वेळी सोबत आणावे.

२. गुणवत्ता यादी पडताळणीसाठी संचालनालयाचा संकेतांक व पासवर्डव्दारे ऑनलाईन पध्दतीने लॉगईन करुन आपले संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी. कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतीरीक्त अन्य यादी (उदा. **Word File etc.**) पडताळणीकरीता वापरली जाणार नाही.

३. प्रवेश नियमांचे उल्लंघन करुन अथवा करुन अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश करणा-या / अपलोड करणा-या संस्थांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करुन संचालनालयास सादर करण्यात येईल व शासन नियमानुसार दंडात्मक कारवाईनंतर आपल्या गुणवत्ता याद्या मंजुर करण्यांत येईल.

४. गुणवत्ता यादीत काही अनियमितता आढळून आल्यास गंभीर कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

५. गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर आढळून आलेल्या सर्व त्रुटीची पुर्तता करण्याबाबत आपले संस्थेला कळविण्यांत येईल. तसेच पडताळणी करतांना उमेदवारांचे प्रवेश रद्द केले/झाले तर संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या आयडीने ऑगईन करुन ऑनलाईन पध्दतीने अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करण्यांत येईल. त्यानंतर गुणवत्ता यादीची नव्याने प्रिंटआऊट काढून त्यानुसार पडताळणी करण्यांत येईल.

६. गुणवत्ता यादी पडताळणी करतेवेळी शुल्क परताव्याबाबत आपले संस्थेबद्दल काही तक्रारी आहे किंवा कसे याची शाहानिशा करुन व तक्रार असल्यास ती नियमानुसार निवारण करण्यांत आली किंवा कसे याची पडताळणी केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणीची कार्यवाही करण्यांत येईल. शुल्क परतावा किंवा कागदपत्रे परत न देणे अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण झालेले नसल्यास प्रवेश नियमावलीतील नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी व यापुढे अशाप्रकारचे नियमबाहय कृत्य होणार नाही असे प्राचार्यांकडून लेखी हमीपत्र सादर केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणी करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. तसेच शुल्क परताव्याबाबत संस्थेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र आपले संस्थेतील प्राचार्यांकडून सादर करावे. त्याचप्रमाणे नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव **(FD)**

(2)

भरणा केली आहे किंवा नाही याची सुध्दा पडताळणी करण्यांत यावी . ठेव भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर गुणवत्ता यादी पडताळणी करण्यांत येईल. तसेच शै. वर्ष २०१५-१६ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यांत आलेली आहे. अशा संस्थाकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार अशा संस्थांनी नोंदणी शुल्क भरण्यात यावे याची नोंद घ्यावी. संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत त्वरीत पडताळणी करुन घ्यावी.

गुणवत्ता यादी मंजुर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा कोणत्याही प्रकारची अनियमितता असल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वसी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील. गुणवत्ता यादी पडताळणीकरीता येताना सोबत तपासणीकरीता लागणारे साहित्य (**जसे – पेपर रिम, पंचिंग मशिन, कॅलक्युलेटर, स्टॅपलर, फ्लॅग, इ.** ) सोबत आणावे.

सहपत्रे : १. वेळापत्रकाची प्रत.
२. मार्गदर्शक सुचना.
३. **Annexure**
४. इतर आवश्यक पत्रे.

( गुलाबराव ठाकरे )
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (का.क्र. १०) यांना माहितीकरीता मानार्थ सादर.